N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नागपुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** कुही

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0274 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/05/2024 05:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 29/05/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 29/05/2024

**Time From (वेळेपासून):** 11:54 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:01 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/05/2024 **Time (वेळ):** 05:26 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/05/2024 05:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय कुही ,कुही

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

सत्यप्रत

वर्षा मते

पोलीस निरीक्षक

ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. रामकष्ण रामजी ठवकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नवेगाव देवी पोस्ट अडम ,कुही ,कुही,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नवेगाव देवी पोस्ट अडम ,कुही ,कुही,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय गजानन कामठीकर | | | 1. तलाठी, साझा क्र 61 हरदोली नाईक,प्लॉट न-740 तांडापेठ नागपुर ,कुही,नागपुर ग्रामीन, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | किरकोळ कागदपत्र | तक्रारदार यांचे कामासंबधी कागदपत्र | 0.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रूपये 500 रु चलनाचे 03 नोटा | 1,500.00 |
| 3 | इतर | इतर परिवहन | लाच रक्कम गुंडाळुन असलेलेल वर्तमानपत्राचा तुकडा | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

अप क्र. - /2024 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 ( संशोधन सन-2018 )
फिर्यादी -श्री. रामकृष्ण रामजी ठवकर, वय 36 वर्ष, व्यवसाय-शेती रा. नवेगाव (देवी), पोस्ट अडम, ता. कूही, जिल्हा नागपूर मो.क्र. 8308975209.
आरोपी - विजय गजानन कामठीकर, वय.26 वर्ष तलाठी, साझा क्र. 61 हरदोली (नाईक) ता कुही जि नागपूर रा. प्लॅंट न.740 तांडापेठ विनकर कॉलोनी नागपुर

घटनास्थळ – तहसिल कार्यालय कुही 1 कि मी पश्चिम
घटना ता वेळ - दि. 29/05/2024 चे 11/54 ते 17/01 वा. दरम्यान
दाखल अधि - पोहवा/संतोषकुमार गुंटीवार ब.न. 226 पो. स्टे कुही
तपासी अधि - मपोनि वर्षा मते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपुर हकिकत-

फिर्याद

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
हैद्राबाद हाउस, नागपूर

दिनांकः- 30/05/2024

श्री. रामकृष्ण रामजी ठवकर, वय 36 वर्ष, व्यवसाय-शेती रा. नवेगाव (देवी), पोस्ट अडम, ता. कूही, जिल्हा नागपूर मो.क्र. 8308975209.

मी दिनांक 28/05/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे एका लोकसेवका विरुध्द मी लाचेची तक्रार दिली पुढीलप्रमाणे.
आज दिनांक 28/05/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय नागपूर येथे येवून तक्रार देतो की, मी वर नमुद पत्यावर माझी आई सौ. वछला रामजी ठवकर, माझे वडील रामजी अमृत ठवकर, पत्नी सौ. पायल रामकृष्ण ठवकर व दोन मुले असे राहातो. माझ्या आईच्या पायांना दुखापत असून तिला चालण्यास त्रास होत असल्याने आईची बाहेरील सर्व शासकीय कामे मी करीत असतो. त्याबाबत माझ्या आईने सन 2023 मध्ये अधिकारपत्र लिहून दिलेले आहे.

माझी आई सौ. वछला रामजी ठवकर व तिची बहिण सौ. प्रमीला आसाराम मते या दोघींना भाऊ नसल्याने त्यांचे माहेरकडून वारसान हक्कानुसार सन 2006 मध्ये मौजा हरदोली (नाईक) येथील प.ह.नं. 61 गट क्र. 276 आराजी 1.93 हे.आर. ही शेतजमीन मिळाली. त्यामध्ये गाव नमुना सात (7/12) यावर माझे आईचे नाव वछला रामजी ठवकर ऐवजी मनु रामजी ठवकर असे नमुद झाले आहे. परंतु त्यावेळी नाव बदल झाल्याचे आमचे लक्षात आले नाही. सन 2022 मध्ये मा.कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द पुनर्वसन विभागीय पथक, नागपूर यांचे कार्यालयाकडून निर्गमीत नोटीस आम्हास जानेवारी 2023 मध्ये प्राप्त झाली. त्यामध्ये नमूद शेतजमीन वहीवाटी रस्त्याचे बांधकामासाठी शासनाद्वारे खरेदी करणेकरीता करारनामा करणेबाबत कळविले होते. सदर कार्यवाहीकरीता

मी प.ह.नं. 61 गट क्र. 276 आराजी 1.93 हे.आर. या शेतजमीनीचे संपूर्ण दस्तऐवज कार्यकारी अभियंता गोसीखुर्द पुनर्वसन विभागीय पथक नागपूर यांचे कार्यालयात जमा केले. अंदाजे 2 महिण्यापुर्वी त्यांनी कागदपत्रे तपासून माझी आई सौ. वछला रामजी ठवकर यांचे नाव गाव नमुना सात यावर आधारकार्ड प्रमाणे नसून मनु रामजी ठवकर असे चुकीचे असल्याचे निदर्षनास आणुन दिले. त्याकरीता मी त्यांना नावात बदल करण्याबाबत विचारले असता मला माझे आईच्या नावाचे राजपत्र बनवून नमूद शेत जमिनीच्या 7/12 च्या रेकॉर्डवरील चुकीचे नाव दुरूस्त करून मिळणेकरीता तहसिल कार्यालयात अर्ज करण्यास सांगितले.

त्याप्रमाणे नाव बदल करण्याकरीता माझ्या आईने तहसिल कार्यालय कूही येथे दिनांक 23/04/2024 रोजी अर्ज केला असून सदरचा अर्ज मी माझे आईचे वतीने तहसिल कार्यालय कूही येथे नेवून दिला. त्यांनतर काल दिनांक 27/05/2024 रोजी मी तहसिल कार्यालय कूही येथे जावून माझे आईचे अर्जाबाबत विचारपूस केली असता तहसिल कार्यालयातील लिपीक श्री. शेख यांनी मला जाहिरनामा दिला व हरदोली (नाईक) साझा क्र 61 चे तलाठी श्री. विजय गजानन कामठीकर यांचे तहसील कार्यालय कुही चे बाजुला असलेल्या कार्यालयात जावून त्यांना देण्यास सांगितले. त्यावरुन मी काल दिनांक 27/05/2024 रोजी वेळ अंदाजे 01.00 ते 01.30 वा. चे सुमारास माझ्या आईला सोबत घेवून श्री. कामठीकर यांचे कुही येथील कार्यालयात जावून तहसिल कार्यालय कूही येथील जाहिरनामा व माझे आईचे शेत जमिनीचे कागदपत्रे दाखविले. त्यावर श्री. कामठीकर यांनी कागदपत्रे तपासून 'मी तुमचे काम उदयाच करून देवू शकतो त्याकरीता मला 1500/-रू. दया' असे मला माझे आईसमक्ष म्हणाले. मी माझ्याकडे पैसे नसल्याचे सांगून तेथून माझे आईसह निघून गेलो. त्यांनतर रात्री 8.40 वा. माझे मोबाईल क्र. 8308975209 यावर मोबाईल क्र. 9673566332 यावरून फोन आला व कामठीकर पटवारी बोलत असल्याचे सांगीतले. मी त्यांना फोन करण्याचे कारण विचारले असता, ते मला 'मी तुमचे काम करून देतो, तुम्ही माझे काम करून टाका,' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना 'माझेकडे सध्या पैसे नाहीत मी बुधवारी कुही येथील कार्यालयात येवून भेटतो' असे म्हटले. यावर कामठीकर यांनी 'ठिक आहे' असे म्हटले. मी माझे आईला कामठीकर यांचा पैश्याकरीता फोन आला असल्याचे सांगितले असता, आईने मला श्री. कामठीकर यांना पैसे देण्यास नकार दिला व तक्रार करण्यास सांगितले.

गैरअर्जदार श्री. विजय कामठीकर, तलाठी, साझा क्र. 61 हरदोली (नाईक) यांनी माझी आई सौ. वछला रामजी ठवकर हिचे मौजा हरदोली नाईक प.ह.नं. 61 गट क्र. 976 आराजी 1.93 हे.आर.चे 7/12 रेकॉर्ड वरील चुकीचे नाव दुरूस्त करून देणेकरीता 1,500/-रू. लाचेची मागणी केली आहे.

मी व माझी आई सौ. वछला ठवकर हिला गैरअर्जदार श्री. कामठीकर यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी माझे आईचे सहमतीने स्वतः लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर येथे येवून तक्रार देत आहे. माझे व माझे आईचे श्री. कामठीकर यांचेशी कोणतेही पुर्व वैमनस्य नसून त्यांचे सोबत कोणतेही आर्थीक देवाण घेवाण बाबतचे व्यवहार नाहीत.

कार्यवाही करीता मी माझे वैयक्तिक बचतीमधील रू. 1500/- (500 रू. दराच्या 3 चलनी नोटा) तसेच माझे व माझ्या आईचे ओळखपत्र (आधारकार्ड), कामासंबंधीचे कागदपत्रे, आईचे अधिकार पत्र, माझ्या वाहनाचे आर.सी. बूकची झेरॉक्स प्रत सादर करीत आहे.

मला लिहता-वाचता येत नाही परंतु माझी सही करता येत असल्यामुळे माझी तक्रार माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत करून घेतली. त्याची प्रत काढून मला वाचून दाखवीली असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.''

वरील प्रमाणे तक्रार नोंदविल्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षा मते यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची माझेशी व सापळा पथकाशी ओळख करून दिली. पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षा मते यांनी दोन्ही पंचांना तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत सांगुन तक्रार पंचांना वाचण्यास दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षा मते यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रारीवर मी, दोन्ही पंचांनी सही केल्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षा मते यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षा मते यांनी सापळा कार्यवाही करीता जमा केलेल्या रुपये 1500/- (ज्यात रू. 500/- दराच्या 03 चलनी नोटा) नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन, त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तद्नंतर लाचेच्या रकमेस अँथ्रासीन पावडर लावली. तसेच व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत मला व दोन्ही शासकीय पंचांना सविस्तर माहिती दिली. यांबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 1 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत. तक्रारदार यांनी गैरअर्जदार यांना बुधवारी येवून भेटतो असे सांगितल्याने सापळा पडताळणी कार्यवाही दिनांक 29/05/2024 रोज बुधवारला कूही येथून करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

दिनांक 28/05/2024 रोजी मला सापळा अधिकारी यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे दिनांक 29/05/2024 रोजी आजनी रोड कुही ता. कुही जि नागपूर येथे माझे दुचाकी वाहन होन्डा कंपनीची ग्राझीया गाडी क्र.एम.एच-40-बि.पी-8151 ने सकाळी वेळ 10/30 वा हजर येवून रस्त्याचे कडेला सापळा पथकाची वाट पाहत थांबून राहीलो. सापळा अधिकारी, दोन्ही पंच व सापळा पथकासह मी थांबून असलेल्या आजनी रोड कुही,ता.कुही जि नागपूर येथे शासकीय वाहनाने सापळा कार्यवाहीचे सर्व साहित्यासह वेळ 10/50 वा हजर आले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षा मते यांनी पंचांसमक्ष गैरअर्जदार यांची लाच रक्कम मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण सोनी कंपनीचे बनावटीचे आय.सी.डी. पी.एक्स 470 मॉडेलचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. मी व पंच क्र. 1 श्री. नेहाल नंदेश्वर असे आम्ही गैरअर्जदार यांचे तहसील कार्यालय कुही येथे माझे कडील दुचाकी वाहनाने जावुन लाचेसंबंधी पडताळणी झाल्यावर आजनी रोड कुही,ता कुही जि नागपूर येथे परत येतील अशा सुचना पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षा मते यांनी मला व पंच क्र. 1 यांना, पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्यांसमक्ष दिल्या. तसेच माझी अंगझडती घेवून मला व पंच क्र 1 यांना सापळा पडताळणीसंबधीच्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकून व्हाईस रेकॉर्डर रेकॉडींग मोडवर 11.54 वाजता पंच क्र 1 यांचे आवाजात सुरू करून व्हाईस रेकॉर्डर मी अंगात घातलेल्या शर्टचे आतील बनीयानमध्ये धाग्याचे सहायाने गळयात लटकावुन लपवुन ठेवण्यात आले. त्यानंतर मी,पंच क्र. 1 यांचेसोबत लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याकरिता गैरअर्जदार श्री. कामठीकर यांना भेटण्याकरीता तहसील कार्यालय कुही चे बाजुला असलेल्या श्री. कामठीकर यांचे कार्यालयात गेलो असता गैरअर्जदार श्री.कामठीकर हे त्यांचे कार्यालयात हजर मिळून आले. मी त्यांना माझी आई सौ वच्छला रामजी ठवकर हिचे शेतजमीनीच्या 7/12 वरील चुकीचे नाव दुरूस्त करून देण्याकरीता विचारले असता, त्यांनी मला गिरडकर साहेब यांना भेटण्यास सांगीतले. त्यावरून मी तहसील कार्यालय कुही येथील गिरडकर साहेब यांना पंच क्र 1 सह जावून भेटलो व माझे कामासंबधी बोलत असतांना गै.अ. श्री कामठीकर हे तिथे आले. त्यांनी गिरडकर यांना माझेकडे इषारा करून माझेसोबत काम असल्याचे सांगून मला गिरडकर साहेब यांचे कक्षाचे बाहेर घेवून जावून माझेसोबत असलेल्या पंच क्र 1 यांना तेथेच थांबण्यास सांगीतले. मी, गैरअर्जदार यांचेसोबत बाहेर गेल्यावर त्यांनी मला खर्चपाणी द्यावे लागेल असे बोलले. त्यावर मी हो म्हणताच त्यांनी देवून द्या आता साहेब आहेत लवकर बनवून देतो असे म्हटले. मी त्यांना पैश्याबद्दल जास्त होते असे बोलताच त्यांनी जास्त म्हणजे किती, मी किती म्हणालो होतो,लवकर सांगा' असे म्हणून घाई करीत होते. त्यांना मी माझी आई दवाखान्यात आहे खूप तकलीफ आहे अशा माझी अडचण सांगून त्यांना किती देवू असे म्हणताच गै.अ यांनी उलट कश्याला केस केली असती,कश्याला केले असते लवकर असे रागाने बोलल्यानंतर मी माझे पैसे विसरलो व ते आईजवळ आहेत असे म्हटल्यावर गै.अ हे गिरडकर यांचे कार्यालयात निघून गेले. मी सुद्धा त्यांचे मागोमाग गिरडकर यांचे कार्यालयात गेलो. तेव्हा गै.अ यांनी मला गिरडकर साहेबाला डाक्युमेंटस दाखवून दे असे बोलून तिथून निघून गेले. त्यानंतर मी काही वेळ श्री गिरडकर यांचेसोबत माझे कामासंबधी बोलून तेथून पंच क्र 1 यांचेसह सापळा अधिकारी थांबुन असलेल्या आजनी रोड कुही येथे आलो. तेथे परत येवून पंच क्र. 1 यांच्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर 12.36 वा. बंद केला. त्यानंतर माझी सापळा पडताळणी करून आल्यानंतरची अंगझडती घेण्यात आली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षा मते,दोन्ही पंच व सापळा पथक यांनी व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण लॅपटापचे सहाय्याने ऐकून गै.अ.श्री. कामठीकर, पद-तलाठी यांनी मला माझे आईचे 7/12 वर असलेले चुकीचे नाव दुरूस्त करून देण्याकरीता लाच रकमेची मागणी केल्याची खात्री केली. त्यानंतर सर्वानुमते गैरअर्जदार श्री.कामठीकर यांचेविरूद्ध सापळा कारवाई लगेच दिनांक 29/05/2024 रोजी आजनी रोड कुही येथुन करण्याचे सर्वानुमते ठरविले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Deepak Naresh Aggarwal(Dy. SP (Deputy Superintendent of Police)) / DGPDNAM9501

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ`.ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Deepak Naresh Agg
**Rank**(पद): Dy. SP (Deputy Super
**No.**(सं.): DGPDNAM9501

(पो. हवा./226 संतोष गुटीवार)
पो. स्टे. कुही, जि - नागपूर.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)